नि. दि. दा. क्र. ५३/२०२२
(मोरेश्वर वि. बाळासाहेब )

## आदेश निशाणी क्र. १८ वर

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. १ ते ८ यांनी म्हणणे व कैफियत देण्यास झालेला २५ दिवसांचा विलंब माफ होऊन कैफियत व म्हणणे स्विकारण्याबाबत आदेश होऊन मिळण्याकरीता दाखल केला आहे.

२. प्रतिवादीचे असे म्हणणे आहे की, प्रस्तुत प्रकरणाची नेमलेली तारीख दि. १०/०६/२०२२ अशी असल्याने व व प्रतिवादींना म्हणणे व कैफियत देण्यास दि. १५/०५/२०२२ पर्यंत मुदत असल्याने व मे महिन्यात दिवाणी कोर्टाचे कामकाज बदं असल्याने प्रतिवादींना मुदतीत कैफियत दाखल करता आली नाही. सदरचा दावा स्थावर मिळकतीबाबत असल्याने यातील प्रतिवादींचे मौल्यवान हक्क व हितसंबंध गुंतलेले आहे. त्यामुळे प्रतिवादींचे म्हणणे व कैफियत स्विकारणे न्यायाच्या दृष्टीने आवश्यक आहे. त्यामुळे प्रतिवादीने प्रस्तुतचा अर्ज मंजूर होवून होवून कैफियत स्विकारण्यात यावी अशी विनंती केली आहे.

३. वादीने प्रस्तुत अर्जास आपले म्हणणे दाखल करुन प्रस्तुतचा अर्ज वस्तुस्थितीला धरुन नसून अपुर्ण व मोघम स्वरुपाचा असल्याने सदर अर्ज नामंजूर करण्यात यावा असे कथन केले आहे. जर अर्ज मंजूर करणेचा झाल्यास प्रतिवादीस खर्चाचे हुकूम व्हावेत अशी विनंती केली आहे.

४. अर्ज व अभिलेखाचे अवलोकन केले. प्रस्तुतचा दावा हा वादीने निरंतर ताकिदीसाठी दाखल केलेला आहे. दाव्याचा गुणदोषावर अंतिमरित्या निकाल होण्यासाठी प्रतिवादीची कैफियत अभिलेखावर असणे आवश्यक आहे. अर्जातील मजकुराबाबत प्रतिज्ञापत्र निशाणी क्र. १९ दाखल केला आहे. त्यामुळे प्रतिवादीला त्याचा बचाव दाव्याच्या गुणदोषावर निकाल होण्यासाठी दाखल करण्याची परवानगी देणे उचित आहे. अर्ज मंजूर केलेस वादीचे नुकसान होणार नाही. मात्र नामंजूर केलेस प्रतिवादीचे नुकसान होणार आहे. सबब, मी खालील आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

०१. प्रस्तुतचा अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

०२. प्रतिवादी क्र. १ ते ८ यांना कैफियत दाखल करण्यासाठी झालेला विलंब प्रतिवादींनी वादीला रक्कम रुपये २००/– कॉस्ट देण्याच्या अटीवर माफ करण्यात येतो.

०३. कॉस्टची रक्कम भरल्यानंतर प्रतिवादी क्र. १ ते ८ चे म्हणणे व कैफियत अभिलेखावर घेण्यात यावी.

०४. दोन्ही पक्षांनी सदर आदेशाची नोंद घ्यावी.

(आदेश खुल्या न्यायदालनात जाहीर.)

(एम. आर. कामत )

दिनांकः– २८/०७/२०२२

३ रे सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
पंढरपूर.

**CERTIFICATE**

I affirm that, the contents of this PDF file Judgment/Order are same word to word, as per the original Judgment / Order.

| | | |
|---|---|---|
| a) Court | : | 3rd Jt. C. J. J. D. & J. M. F. C. Pandharpur |
| b) Name of Stenographer | : | S. M. Shaikh,. |
| c) Date of Order/Judgment | : | 28/07/2022. |
| d) Judgment/Order signed by the Presiding Officer on | : | 28/07/2022. |
| e) Judgment/Order uploaded on | : | 29/07/2022. |